# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - १६ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ५२** **विषय क्रमांक - ५२**

दिनांक : ०५/०८ /२०२४ विभाग : नगररचना विभाग.:

**प्रस्तावाचा विषय :-** मंजुर विकास योजना अहमदनगर वाढीव हद्द महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमातील कलम - १२७ अन्वये आरक्षण क्रं.४५ पार्क सावेडी स.नं.२४९/४ व २४९/५ क्षेत्र १.३४ हेक्टर खरेदी घेणे बाबत सुचना.

---*---

**ठराव :-**

उपरोक्त विषयान्वये कलम १२७ अन्वये आरक्षण क्र.४५ पार्क या आरक्षणाखालील सावेडी स.नं.२४९/४ व २४९/५ क्षेत्र १.३४ हेक्टर जागा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमातील कलम १२७ अन्वये दिलेल्या खरेदी सुचनेच्या अनुषंगाने खरेदी घेणे बाबतचा विषय मा.महासभेपुढे सादर करण्यांत आलेला आहे.

सदर प्रस्तावातील आरक्षणाखालील जमीन भुसंपादन करणेसाठी रक्कम रूपये २८,६७,०२,८७५/- (अक्षरी रुपये अठ्ठावीस कोटी सदुसष्ठ लाख दोन हजार आठशे पंच्च्याहत्तर मात्र) एवढी रक्कम जागा मालकास अदा करावी लागेल. उपरोक्त कार्यवाही कलम १२७ च्या खरेदीसुचना दिलेल्या तारखेपासून दोन वर्षाच्या विहित मुदतीत करणे बंधनकारक आहे.सदर खरेदी सुचना देवून साधारण एक वर्ष होवून गेलेले आहे.भुसंपादनासाठी इतक्या मोठया निधीची तरतुद करावी लागेल या बाबत करावयाच्या कार्यवाही बाबत त्वरीत निर्णय घेणे आवश्यक आहे.अन्यथा उपरोक्त कलम १२७ च्या नोटीसीमधील जमीनीवरील आरक्षणे विहित मुदत संपल्यानंतर व्यपगत होईल.त्यामुळे या प्रकरणी प्रथम जागा मालक यांची बैठक आयोजीत करून संबंधीतांना या प्रस्तावासाठी हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) घेण्याची विनंती करावी किंवा अन्य मार्गाने समावेशक आरक्षण धोरण इत्यादी मार्गाने जागेचा विकास करणेसाठी तयार करणेचे प्रयत्न करावेत.सदर बैठकीनंतर बैठकीच्या इतिवृत्तासह प्रस्ताव फेरसादर करावा

उपरोक्त प्रमाणे त्वरीत अंमलबजावणी करणेस मा.प्रशासक सर्वसाधारण सभेची मंजूरी देत आहे.

**निर्णय :-**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (मेहेर लहारे) | (यशवंत डांगे) |
| प्र.ागरसचिव | आयुक्त तथा प्रशासक |
| अहमदागर महाागरपालिका. | अहमदागर महाागरपालिका. |

| | |
|---|---|
| . | अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर<br>नगरसचिव विभाग |

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - १६ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.५३** **विषय क्रमांक - ५३**

दिनांक : ०५/०८ /२०२४ विभाग : प्रकल्प विभाग.:

**प्रस्तावाचा विषय :-** प्रधानमंत्री आवास योजने (AHP) अंतर्गत मोरचुदनगर स.नं.५ (संजयनगर) २४१ सदनिका Curtailment करणे बाबत मा.कार्यकारी अभियंता, म्हाडा, मुंबई यांना कळविणे बाबत..

---*---

**ठराव :-**

मा.अप्पर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे दिनांक १९/०७/२०२४ चे पत्राचे अनुषंगाने मा.कार्यकारी अभियंता-२, म्हाडा, माबई यांचा संदभ्र क्रं.३ अन्वयेचा ई-मेल इकडेस प्राप्त झाला आहे. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत AHP मधील मोरचुदनगर स.नं.५ येथील २९८ पैकी ५०% सदनिकांचे दिनांक २६/०७/२०२४ पर्यंत MIS Portal वर Geo-tagging अद्यावत करण्यात यावे. तसे होत नसल्यास त्याची खातरजमा करुन सदरचा प्रस्ताव रद्द किंवा Curtailment साठी सादर करणे बाबत सुचना प्राप्त आहेत.

या अनुषंगाने सादर करण्यांत येते की, अहमदनगर महान्००D६रपालिके मार्फत प्रधानमंत्री आवास योजना (AHP) आतर्गंत मोरचुदनगर स.नं.५ (संजयनगर) येथे २९८ सदनिका बांधणेसाठी कंत्राटदार व प्रकल्प सल्लागार म्हणून करी स्टोन डिझाईन कोल्याब्रेटीव्ह यांना कार्यारंभ देण्यात आला आहे. या प्रकल्पास दिनांक ३१/१२/२०२४ पर्यंत मुदतवाढ देखील देण्यात आलेली आहे.

विषयांकित प्रकल्प हा नाविन्यपुर्ण प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या उभारणीसाठी करी स्टोन डिझाईन कोल्याब्रेटीव्ह व स्नेहालय या दोन सामाजिक संस्था काम करत असुन शासनाकडुन प्राप्त होणा-या अनुदाना व्यतिरिक्त लाभार्थी हिस्सा हा करी स्टोन डिझाईन कोल्याबेटीव्ह सामाजिक संस्था उभारत आहे.

सन २०१८ व सन २०२२ च्या दरांमध्ये मोठी वाढ झाली असल्या कारणाने प्रकल्पास जास्तीचा खर्च येत असल्याने अतिरिक्त अनुदान शासनाकडुन मिळणे बाबत करी स्टोन डिझाईन कोल्याब्रेटीव्ह यांनी इकडेस मागणी कलेली आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे सादर कलेला आहे.

सद्यस्थितीत सदर ठिकाणी ३३ सदनिकांचे काम पुर्ण झाले असुन सदर सदनिकेचा ताबा संबंधित लाभार्थींना देण्यांत आला आहे. करी स्टोन डिझाईन कोल्याब्रेटीव्ह यांनी २४ सदनिकांचे काम सुरु करण्यांत येणार असले बाबत कळविले आहे. तसेच आगरकर मळा ते आयुर्वेदीक दरम्यान १५ मिटर रुंदीच्या रस्त्याचे काम सुरु झाले आहे. या रस्त्याच्या रुंदीमुळे यापुर्वीच मंजूर असलेल्या विषयांकित प्रकल्प बाधीत होत आहे. याबाबत नगररचना विभागाशी वेळोवेळी चर्चा झाली असुन मा.सहाय्यक संचालक, नगररचना यांनी दिनांक २९/०७/२०२४ रोजी नमुद केलेनुसार विषयांकित प्रकल्पासाठी सुधारीत बांधकाम परवानगी घ्यावी लागणार आहे. त्यामुळे याबाबत ही मे करी स्टोन

कम्युनिटी कोलाब्रेटीव डिझाईन यांना सुधारीत बांधकाम परवानगी साठी प्रताव सादर करणेकरीता कळविणे गरजेचे आहे. एजन्सी मार्फत ज्या २४ सदनिकांचे काम सुरु होणार आहे ती इमारत रस्त्याच्या रुंदीमुळे बाधीत होत असल्याने हे कामही सुरु करता येणार नाही. असे दिसुन येते.

करी स्टोन डिझाईन कोल्याब्रेटीव्ह यांचे प्रतिनिधींशी समक्ष चर्चा झाली. २४ सदनिकांचे काम आहे. सप्टेंबर मध्ये सुरु करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. परंतु मा.अप्पर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग व मा.कार्यकारी अभियंता-२, म्हाडा, मुंबई यांचे संदर्भीय पत्र पाहता प्रकल्पाचे उर्वरीत काम दिनांक ३१/१२/२०२४ पर्यंत पुर्ण करणे शक्य नाही. तसेच ५०% सदनिकांचे Geo-tagging करणेही शक्य नाही. त्यामुळे प्राप्त सुचनेनुसार सदरच्या प्रकलपामधील २४१ सदनिका Curtailment करणे आवश्यक आहे. परंतु Curtailment करत असतांना या प्रकलपाचा समावेश भविष्यात येणा-या घरकुल योजनेमध्ये करणे योग्य राहील.

या प्रकल्पासाठी करी स्टोन डिझाईन कोल्याब्रेटीव्ह हीच संस्था पीएमसी म्हणून काम करत आहे. त्यामुळे Curtailment चा प्रस्ताव तयार करणेसाठी त्यांना कळविणे आवश्यक आहे. करीता

१) या प्रकल्पाचे डीपीआर Curtailment चा प्रस्ताव तयार करणेसाठी करी स्टोन डिझाईन कोल्याब्रेटीव्ह यांना कळविणेस.

२) प्रधानमंत्री आवास योजना (AHP) आतर्गंत मोरचुदनगर स.नं.५ (संजयनगर) येथे २९८ पैकी २४१ सदनिका Curtailment करणेसाठी तसेच सदरचा प्रस्ताव मा.कार्यकारी अभियंता, म्हाडा, मुंबई यांचेकडेस सादर करण्यास मा.प्रशासक सर्वसाधारण सभेची मंजूरी देण्यांत येत आहे.

---*---

**निर्णय :-**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.ागरसचिव
अहमदागर महाागरपालिका.

सही/-
(यशवंत डांगे)
आयुक्त तथा प्रशासक
अहमदागर महाागरपालिका.